IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766
AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-57

## Special Issue of Department of Sociology, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)

Date: 26 June 2021

# TRIBAL SOCIETY

## IN CONTEMPORARY INDIA : ISSUES , PROBLEMS & REMEDIES

**Chief Editor**
**Dr. Subodh Kumar Singh**
Principal

**Editor**
**Dr. Shrinivas Pilgulwar**
Head, Dept of Sociology



Book-2

# भारतातील आदिवासींच्या चळवळी

**प्रा. डॉ. विठ्ठल गोपा चव्हाण**

*समाजशास्त्र विभाग प्रमूख, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज*

*जि. गडचिरोली.*

## पार्श्वभूमी

आदिवासी समाज म्हणजे आदिपासून अतिदुर्गम भागात डोगराळ प्रदेशात राहून सभोवतालच्या वातावरणावर अवलंबून आपल्या उपजिवीका भागविणारा शांतता प्रिय समाज होय. अगदी सुरूवातीपासून दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या लोकांना आदिवासी असे म्हणतात. आदिम समाज पूर्वीपासून रानावनात डोंगर कपाऱ्यात, अतिदुर्गम भागात निवास करणारा निसर्गप्रेमी व शांतता प्रिय समाज म्हणून ख्याती आहे. आदिवासी रूढी, प्रथा, परंपरा व अधंश्रध्देला चिकटून असणारा समाज विकासाच्या प्रक्रियांपासून कोसोदूर व प्रगतीपासून आजही वंचित आहे. २०११ च्या जणगणनेनुसार आदिम समाजाची लोकसंख्या ८.२ टक्के एवढी असून हा समाज संपूर्ण भारतभर विखूरलेली आहे.

भारतातील आदिवासी समाज साधारणत: दक्षिण भारतातील डोंगराळी भागात, मध्य भारतात आणि पूर्वेकडील भागात मोठया प्रमाणात आढळून येतो. यामध्ये गोंड, संथाल, भिल्ल, या जमातीची संख्या सर्वाधिक आहे. तर दक्षिण भारतातील निलगिरी पर्वतावरील तोडा जमातीची संख्या आज नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. पूर्वी हा समाज प्रगत समाजापासून कोसो दुर अतिदुर्गम भागात, डोंगराळ प्रदेशात शिकारी व मासेमारी करून आपली उपजिवीका भागवित असे. या समाजातील व्यक्ती उघडा नागडा असणारा, चेहऱ्याने ओबडधोबड दिसणारा. इतर जगाशी कोणत्याही प्रकारचा संपर्क नसणाऱ्या समाजाची मात्र शिकलेल्या किंवा प्रगत समाजाकडून मोठया प्रमाणात पिळवणूक झाल्याचे दिसुन येते. विशेष करून आदिवासी चळवळीचा मुख्य उद्देश शासकीय व निमशासकीय स्तरावरील आदिवासींचे शोषण होय. त्यामुळे आदिवासी समाजाची सुधारणा झाली नाही. आजही त्यांना सतत गरीबी, उपासमारी, दारिद्रय, कुपोषण यासारख्या समस्यांनी ग्रासलेले आहे. याचे मुख्य कारण व्यापारी, सेठसावकार, जमीनदार, ठेकेदार, हे लोक अज्ञान व भोळेपणाचा फायदा घेवून आदिवासींचे शोषण करत होते. त्यामुळे अदिवासींच्या मनात हळूहळू असंतोषाची भावना निर्माण झाली व त्यांचे रूपातंर सामाजिक चळवळी होवू लागली.

आजही आदिवासी समाज सरळ, साधाभोळा व प्रामाणिक आहे. पण त्यांना सुसंस्कारीत समाजाचे डावपेचाविषयी फारसी माहिती नव्हती. कारण या समाजात शिक्षणाचा अभाव असल्यामुळे त्यांना अक्षराची ओळख नव्हती. याचाच फायदा घेत जमीनदार, सेठसावकार,